## स्थानिक गुन्हे शाखा,नाशिक ग्रामीण

पोलीस अधीक्षक कार्यालय, नाशिक ग्रामीण,आडगाव, नाशिक-पिन ४२२००३

दुरध्वनी नंबर ०२५३-२३०९७१० E.Mail- pilcbnskr@gmail.com


---

# प्रेसनोट

दिनांक:- १०/०८/२०१८

**नाशिक शहर व ग्रामीण भागात भरवस्तीत घरफोडया करणारे सराईत गुन्हेगारास स्थागुशाचे पथकाने केले जेरबंद**

---

नाशिक ग्रामीण जिल्हयात गेल्या काही दिवसांपासुन बंद घरे व दुकानांवर पाळत ठेवुन घरफोडयांचे प्रमाण वाढले होते, त्यामुळे सामान्य नागरीक, नोकरदार तसेच व्यापारी वर्गामध्ये घबराहटीचे वातावरण निर्माण झाले होते. वाढत्या घरफोडीचे गुन्हयांना आळा बसावा यासाठी नाशिक ग्रामीण जिल्हयाचे **पोलीस अधीक्षक श्री. संजय दराडे सो. व अपर पोलीस अधीक्षक श्री. विशाल गायकवाड सो.** यांनी जिल्हयातील नाउघड घरफोडीचे गुन्हयांचा सविस्तर आढावा घेवुन गुन्हे उघडकीस आणणेसाठी सतर्क रात्रगस्त करणेबाबत सुचना दिल्या होत्या. त्यानुसार स्थानिक गुन्हे शाखेचे **पोलीस निरीक्षक श्री. अशोक करपे** यांनी घरफोडीचे रेकॉर्डवरील गुन्हेगारांची गुन्हा करण्याची पध्दत व चोरून नेलेले मुद्देमाल कोठे विक्री केला जातो याबाबत गोपनीयरित्या माहिती घेवुन स्थागुशाचे पथकास गुन्हे उघडकीस आणणेसाठी मार्गदर्शन करून सुचना दिल्या.

त्याप्रमाणे दिनांक ०८ जुलै २०१८ रोजी मध्यरात्रीचे सुमारास स्थानिक गुन्हे शाखेचे पथकातील अधिकारी व कर्मचारी रेकॉर्डवरील गुन्हेगारांचा शोध घेत होते, दरम्यान स्थागुशाचे पोलीस निरीक्षक श्री. अशोक करपे यांना खब-यांमार्फत मिळालेल्या गुप्त बातमीनुसार वणी व नाशिक शहर परिसरात घरफोडया करणारे काही गुन्हेगार अशोका मार्ग, वडाळा गाव परिसरात वास्तव्यास असलेबाबत खात्रीशीर समजले. त्यानुसार स्थागुशाचे पथकाने अशोका मार्ग व पखालरोड परिसरात रात्रभर सापळा रचुन घरफोडया करणारा सराईत गुन्हेगार नामे **१) रामेश्वर मोतीराम गर्दे, वय २५, रा. अशोका मार्ग, हिरेनगर, नाशिक** यास शिताफिने ताब्यात घेतले. सदर आरोपीतास विश्वासात घेवुन चौकशी केली असता त्याने त्याचा साथीदार नामे २) अमीन मन्सुरी बादशहा, रा. गांधीनगर, गुजराथ याचेसह गेल्या हप्त्यात वणी गावातील शंखेश्वर मंदिर परिसरात तसेच नाशिक शहरातील धात्रक फाटा, व मेरी कॉलनी परिसरातील बंद घराचे कडी कोयंडा तोडुन घरफोडया केल्या असल्याची कबुली दिली आहे. सदर बाबत वणी पोलीस ठाणेस दाखल असलेला । **गुन्हा रजि.नं. १४२/२०१८ भादविक ४५७,३८०** हा गुन्हा उघडकीस आलेला असुन आरोपीताचे कब्जातुन गुन्हयात वापरलेली **काळे रंगाची मारूती वॅगनआर कार क्र. एम.एच.०४.बीडब्ल्यु. ७१२८** तसेच ०१ सॅमसंग मोबाईल फोन असा एकुण ३,०३,०००/- रू. चा मुद्देमाल जप्त केला आहे.

वरील आरोपी नामे रामेश्वर गर्दे हा सराईत गुन्हेगार असुन त्याचेविरूध्द अंबड पोलीस ठाणेस खुनाचा गुन्हा दाखल आहे. सदर आरोपी हा मध्यवर्ती कारागृहात असतांना त्याची साथीदार नामे अमीन मन्सुरी याचेसोबत ओळख झाली होती, सदर आरोपीतांनी कारागृहातुन बाहेर आलेनंतर घरफोडीचे गुन्हे केले असल्याचे तपासात निष्पन्न झाले आहे. आरोपी अमीन मन्सुरी याचा स्थागुशाचे पथक शोध घेत असुन त्याचेकडुन अजुन काही गुन्हे उघडकीस येण्याची शक्यता आहे.

नाशिक ग्रामीण जिल्हयाचे पोलीस अधीक्षक **श्री. संजय दराडे सो** व अपर पोलीस अधीक्षक **श्री. विशाल गायकवाड सो** यांचे मार्गदर्शनाखाली **स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक श्री. अशोक करपे,** पोलीस उपनिरीक्षक **श्री.मच्छिंद्र रणमाळे**, पोहवा दिपक आहिरे, दत्तात्रय साबळे, पुंडलीक राउत, गणेश वराडे, पोना अमोल घुगे, पोकॉ हेमंत गिलबिले, विश्वनाथ काकड, प्रदिप बहिरम यांचे पथकाने वरील आरोपीस ताब्यात घेवुन घरफोडीचे गुन्हे उघडकीस आणलेले आहे.